**प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणा संदर्भात केंद्रीय प्राथमिक शाळांची स्थापना या संदर्भातील सर्व समावेशक आदेश.**

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय,क्रमांकः पीआरई १०९९/(२२८३)/प्राशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १३ ऑगस्ट, १९९९

सांगली जिल्हा परिषद
प्राथमिक शिक्षण विभाग
23 AUG 1999
जावक क्र. २०६
उप शि. अ. शि. अ.

संदर्भ :
१) शासन निर्णय,शालेय शिक्षण विभाग,क्रमांकः पीआरई १०९४/७०४(१)/प्राशि-१, दिनांक १४.११.१९९४.
२) शासन परिपत्रक, क्रमांकः पीआरई १०९४/७०४/प्राशि-१, दिनांक १९.१.१९९५.
३) शासन पूरक पत्र, शालेय शिक्षण विभाग, क्रमांकः पीआरई १०९४/७०४/प्राशि-१, दिनांक २७.७.१९९५.
४) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांकः पीआरई १०९५/८८७/प्राशि-१, दिनांक १०.१०.१९९५.
५) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांकः पीआरई १०९५/१०२२/प्राशि१, दिनांक १५.१०.१९९५.
६) शासन पूरक पत्र, शालेय शिक्षण विभाग, क्रमांकः पीआरई १०९७/१६६१/प्राशि-१, दिनांक २८.८.१९९७.
७) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांकः व्हीआयपी १०९७/१४९२/प्राशि-१, दिनांक २४.११.११९७.

<u>पार्श्वभूमी</u> :- राज्यामध्ये प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासंदर्भात स्थापन करण्यात आलेल्या केंद्रीय प्राथमिक शाळा व या केंद्रीय प्राथमिक शाळांसाठी निर्माण करण्यात आलेल्या केंद्र प्रमुखांच्या पदांच्या अनुषंगाने वेळोवेळी शासनाने आदेश निर्गमित केलेले आहेत. या योजनेची व आदेशांची एकत्रित माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने एक सर्व समावेशक शासन निर्णय निर्गमित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u> :- प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण आणि साक्षरता या विषयावर नियुक्त केलेल्या कार्यबल गटाने सादर केलेल्या महाराष्ट्र राज्याच्या कृति कार्यक्रमातील केंद्रीय प्राथमिक शाळा स्थापन करण्याविषयीची शिफारस शासनाच्या विचाराधीन होती. या शिफारशीचा विचार करुन राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या सर्व प्राथमिक शाळांत सर्वांसाठी शिक्षणाचे सूक्ष्म नियोजन, सतत उपस्थिती टिकविणे व शैक्षणिक दर्जा उंचावण्याकरिता ४,८६० केंद्रीय प्राथमिक शाळा स्थापन करण्याचा निर्णय शासनाने १९९४ मध्ये घेतला. या प्रत्येक केंद्रीय प्राथमिक शाळेकरिता प्रशिक्षित पदवीधर केंद्र प्रमुखाचे एक पद निर्माण करण्याचाही शासनाने निर्णय घेतला. त्यानुसार दिनांक १४ नोव्हेंबर, १९९४ च्या शासन निर्णयान्वये राज्यामध्ये प्रपत्र "अ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे रुपये १४००-२६००+ रुपये १२५/- विशेष वेतन या वेतनश्रेणीत एकूण ४८६० पदवीधर प्रशिक्षित केंद्र प्रमुखांची पदे निर्माण करण्यात आली आहेत.

२. <u>केंद्रीय प्राथमिक शाळा स्थापनेमागील उद्दीष्टे खालीलप्रमाणे आहेत :-</u>

१) समूहातील प्राथमिक शाळांचे प्रशासकीय आणि शैक्षणिक संनियंत्रण करणे.

एच-613(1000-8-99)-1

समूहातील प्राथमिक शाळांसाठी प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाची मासिक / वार्षिक उद्दिष्टे ठरवून

२) समूहातील प्राथमिक शाळांसाठी प्राथमिक शिक्षणाच्या अध्यापकांची मासिक गट संमेलने घेऊन अध्यापनाचे किमान देणे.

३) समूहातील शाळांचा दर्जा वाढण्यासाठी अध्यापकांची मासिक गट संमेलने घेऊन प्राथमिक शिक्षकांची व्यावसायिक क्षमता उंचावणे. कार्यक्रम ठरवून देणे व आदर्श पाठांचे आयोजन करून प्राथमिक शिक्षकांची व्यावसायिक क्षमता उंचावणे.

४) समूहातील सर्व शिक्षकांचे मासिक अध्यापन उद्दिष्ट परिपूर्तीचे मूल्यमापन दरमहा गट संमेलनात करणे.

५) दर तिमाहीस समूहातील सर्व शाळांमधील सर्व विद्यार्थ्यांच्या किमान अध्ययन क्षमता संपादणूकीसंबंधी मूल्यमापन करणे.

६) ग्राम शिक्षण समितीचे मार्गदर्शन, कामाचा आढावा तसेच पालक भेटीचे कार्यक्रम निश्चित करणे.

७) दर्जा उंचावण्याकरिता वेळोवेळी पुरविण्यात आलेले शैक्षणिक साहित्य याचा परिपूर्ण वापर करणे व शिक्षकांना मार्गदर्शन.

३. <u>केंद्र शाळा शिक्षण सल्लागार समिती :-</u>

केंद्रीय प्राथमिक शाळांच्या योजनेचे प्रभावी नियोजन आणि अंमलबजावणीचे संनियंत्रण करण्यासाठी प्रत्येक केंद्रीय प्राथमिक शाळेसाठी एक याप्रमाणे केंद्र शाळा शिक्षण सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली असून तिची रचना पुढीलप्रमाणे आहे :-

| | |
|---|---|
| १) केंद्र प्रमुख | नियंत्रक |
| २) केंद्रीय प्राथमिक शाळेच्या कार्यक्षेत्रातील प्राथमिक शाळांचे दोन मुख्याध्यापक. | सदस्य |
| ३) केंद्रीय प्राथमिक शाळेच्या कार्यक्षेत्रातील एक महिला शिक्षक प्रतिनिधी | सदस्य |
| ४) ग्राम शिक्षण समितीच्या सदस्यांपैकी एक महिला प्रतिनिधी | सदस्य |
| ५) केंद्रीय प्राथमिक शाळेच्या कार्यक्षेत्रातील महिला मंडळाचा एक प्रतिनिधी | सदस्य |
| ६) एक महिला पालक प्रतिनिधी | सदस्य |
| ७) केंद्रीय प्राथमिक शाळेच्या कक्षेतील एक निवृत्त मुख्याध्यापक/ शिक्षक प्रतिनिधी (राज्य/राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त असल्यास प्राधान्य) | सदस्य |
| ८) केंद्रीय प्राथमिक शाळांच्या कक्षेत येणाऱ्या माध्यमिक शाळा समूह केंद्राचे मुख्याध्यापक. | सदस्य |

या समितीच्या सदस्यांची नियुक्ती विकास गट शिक्षण सल्लागार समितीच्या मान्यतेने केंद्र प्रमुख करतील. या समितीच्या अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीचा कालावधी तीन वर्षाचा राहिल.

या समितीची बैठक प्रत्येक महिन्यात एकदा होईल. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या संदर्भात मूलभूत आकडेवारी गोळा करणे, केंद्रीय प्राथमिक शाळेच्या कार्यक्षेत्रातील शाळांच्या भौतिक सुविधा आणि शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी शाळानिहाय नियोजन करणे आणि समूहातील प्राथमिक शाळांच्या उपक्रमांचे संनियंत्रण करणे ही या समितीची महत्त्वाची कामे राहतील.

४. <u>प्रत्येक जिल्ह्यात स्थापन केलेल्या केंद्र प्राथमिक शाळांची जिल्हानिहाय संख्या :-</u>

| अ.क्र. | जिल्हा | केंद्रीय प्राथमिक शाळांची संख्या |
|---|---|---|
| १ | नाशिक | २४४ |
| २ | ठाणे | २५३ |

एप-613(1000-8-99)-1अ

| | | |
|---|---|---|
| ३ | धुळे( नंदूरबारसह) | १७९ |
| ४ | जळगांव | १६४ |
| ५ | पुणे | ३०५ |
| ६ | अहमदनगर | २४६ |
| ७ | सोलापूर | १९९ |
| ८ | रायगड | २२८ |
| ९ | कोल्हापूर | १७१ |
| १० | सातारा | २२३ |
| ११ | सांगली | १३६ |
| १२ | रत्नागिरी | २५१ |
| १३ | सिंधुदुर्ग | १४४ |
| १४ | औरंगाबाद | १२८ |
| १५ | जालना | १०६ |
| १६ | परभणी (हिंगोलीसह) | १५४ |
| १७ | बीड | १६४ |
| १८ | नांदेड | १७५ |
| १९ | उस्मानाबाद | ८० |
| २० | लातूर | १०२ |
| २१ | अमरावती | १३९ |
| २२ | अकोला (वाशिमसह) | १५६ |
| २३ | यवतमाळ | १८० |
| २४ | बुलढाणा | १३१ |
| २५ | नागपूर | १३६ |
| २६ | वर्धा | ८७ |
| २७ | भंडारा (गोंदियासह) | १४५ |
| २८ | चंद्रपूर | १३३ |
| २९ | गडचिरोली | १०१ |
| | एकूण | ४,८६० |

५. **केंद्रीय प्राथमिक शाळांच्या केंद्र प्रमुख पदावर नियुक्ती व शैक्षणिक अर्हता इत्यादी :-**

केंद्रीय प्राथमिक शाळांसाठी निर्माण करण्यात आलेली केंद्र प्रमुखांची रुपये १४००-२६००+ रुपये १२५/-विशेष वेतन या वेतनश्रेणीतील पदे सेवाजेष्ठता व गुणवत्ता या निकषांनुसार प्रशिक्षित पदवीधर प्राथमिक शिक्षकांच्या संवर्गातील त्यांच्या सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती देऊन भरण्यात यावीत. केंद्र प्रमुखांची पदोन्नतीने भरावयाचे पदे सेवेत असलेल्या पदवीधर प्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांच्या त्यांच्या प्राथमिक शिक्षकांच्या संवर्गातील सेवाजेष्ठतेनुसार भरण्यांत यावीत, गुणवत्तेकरिता गोपनीय अहवालाचे वर्गीकरण "ब" असणे-आवश्यक राहिल. मात्र शासन निर्णय, दिनांक २.२.१९७२ नुसार निर्माण करण्यात आलेल्या केंद्रीय प्राथमिक शाळा मुख्याध्यापक पदी सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार ज्यांची नियुक्ती करण्यात आली आहे त्या सर्वांना नवनिर्मित केंद्र प्रमुख पदावर सामावून घेतले जाईल व त्यानंतर केंद्रीय प्राथमिक शाळा मुख्याध्यापकाना केंद्रप्रमुख पदावर सामावून घेतल्यामुळे रिक्त

होणारी मुख्याध्यापकांची पदे "पात्र मुख्याध्यापक" पदावर नियुक्ती करण्याकरिता विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार करण्यात यावी.

वरील परिच्छेद एक नुसार नियुक्त करण्यात आलेल्या केंद्रीय प्राथमिक शाळांच्या केंद्र प्रमुखांचे गोपनीय अहवाल हे जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग, श्रेणी-२ मधील शिक्षण विस्तार अधिकारी लिहितील. या अधिकाऱ्यांनी केंद्रीय प्राथमिक शाळांच्या केंद्र प्रमुखांनी पटनोंदणी, मुलांना शाळेत कायम टिकविणे व किमान अध्ययन क्षमता प्राप्त करणे याविषयी निश्चित केलेल्या वार्षिक उद्दिष्टांच्या पूर्ततेच्या आधारे गोपनीय अहवाल लिहावेत व या गोपनीय अहवालांचे पुनर्विलोकन गट शिक्षणाधिकारी यांनी करावे.

केंद्रीय प्राथमिक शाळांच्या केंद्रप्रमुखांना नैमित्तिक रजा मंजूर करण्याचे अधिकार संबंधित शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना रहातील.

६. केंद्रीय प्राथमिक शाळेसाठी निर्माण करण्यात आलेली केंद्र प्रमुखांची रुपये १४००-२६०० + रुपये १२५/- विशेष वेतन या वेतनश्रेणीतील पदे सेवाजेष्ठता व गुणवत्ता या निकषानुसार सेवेत असलेल्या पदवीधर प्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांच्या, त्यांच्या प्राथमिक शिक्षकांच्या संवर्गातील सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नतीने भरावयाची आहेत. या संदर्भात या ठिकाणी असे स्पष्ट करण्यात येते की, हे प्रशिक्षित पदवीधर शिक्षक बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. पदवीसह बी.एड्. ही अर्हता धारण करणारे प्राथमिक शिक्षक असणे आवश्यक आहे.

केंद्रीय प्राथमिक शाळांच्या केंद्र प्रमुख पदावर पदोन्नती देण्याकरिता बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. या पदवीला शासनाने वेळोवेळी समकक्षता दिलेली अर्हता धारण करणारे उमेदवार किंवा डी.एड्. पदविका धारण करणारे पदवीधर प्राथमिक शिक्षक पात्र असणार नाहीत. तथापि, ज्या प्राथमिक शिक्षकांनी राज्यातील किंवा राज्याबाहेरील विद्यापीठातून बी.ए. किंवा समकक्ष पदवी प्राप्त केलेली आहे अशा पदवीधर प्राथमिक शिक्षकांनी राज्यातील मान्यताप्राप्त विद्यापीठातून बी.एड्. ही पदवी प्राप्त केली असल्यास अशा शिक्षकांना केंद्रीय प्राथमिक शाळांच्या केंद्र प्रमुख पदावर दिनांक २४.११.१९९७ (यासंबंधीचे आदेश निर्गमित केलेल्या शासन निर्णयाची तारीख) पासून नियुक्ती देता येईल.

प्राथमिक शाळांच्या केंद्र प्रमुख पदावर नियुक्तीसाठी प्रशिक्षित पदवीधर म्हणजे बी.ए./ बी.कॉम./ बी.एस्सी. सह बी.एड्. ही शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या प्राथमिक शिक्षकांप्रमाणे बी.ए./ बी.कॉम./ बी.एस्सी. सह बी.पी.एड्. किंवा बी.एड्. (फिजिकल) ही शैक्षणिक अर्हता धारण करणारे सेवांतर्गत प्राथमिक शिक्षकही दिनांक ११ ऑक्टोबर, १९९५ या तत्संबंधीच्या शासन निर्णयाच्या दिनांकापासून पात्र आहेत. मात्र, अशा बी.पी.एड्. किंवा बी.एड्. (फिजिकल) पदवीधारक शिक्षकांनी या अभ्यासक्रमासाठी शारीरिक शिक्षणाबरोबरच एक शालेय विषय अभ्यासला असला पाहिजे.

७. केंद्र प्रमुखांच्या पदांचे संदर्भात स्पष्ट करण्यात येते की, केंद्र प्रमुखांची पदे नव्याने निर्माण करण्यात आली असल्यामुळे पात्र मुख्याध्यापकाचे पद मंजूर असलेली जी शाळा केंद्रीय प्राथमिक शाळा म्हणून निश्चित केली जाईल त्या शाळेत केंद्र प्रमुखाचे पद तसेच पात्र मुख्याध्यापकाचे पदही राहिल. पात्र मुख्याध्यापक हे पूर्वीप्रमाणे त्या शाळेपुरते दैनंदिन शैक्षणिक व प्रशासनिक स्वरुपाचे कामकाज पाहतील.

८. **<u>प्राथमिक शाळांचे केंद्रीय प्राथमिक शाळांमध्ये रुपांतर करण्यासाठी आणि केंद्रीय प्राथमिक शाळांना जोडावयाच्या प्राथमिक शाळा निश्चित करण्यासाठी निकष व कार्यपद्धती.</u>**

१) ज्या प्राथमिक शाळेचे केंद्रीय प्राथमिक शाळेत रुपांतर करावयाचे आहे, ती शाळा मध्यवर्ती ठिकाणी असावी.

२) केंद्रीय प्राथमिक शाळांची निवड करण्याकरिता खालील प्राधान्यक्रम विचारात घेण्यात यावेत :-

अ) माध्यमिक शाळा असलेल्या ठिकाणच्या मोठ्या प्राथमिक शाळा,

ब) पूर्ण प्राथमिक शाळा,

क) २०० पेक्षा जास्त पट असलेल्या मध्यवर्ती ठिकाणच्या प्राथमिक शाळा,

ड) आदिवासी आणि दुर्गम क्षेत्रात अपवादात्मक परिस्थितीत २०० पेक्षा कमी पट असलेल्या प्राथमिक

शाळांचाही विचार करता येईल.
३) तालुक्यातील भौगोलिक परिस्थिती व दळणवळणाची व्यवस्था बँक, पोस्ट ऑफिस इत्यादी विचारात घेऊन ८ ते १२ प्राथमिक शाळांसाठी एक याप्रमाणे केंद्रीय प्राथमिक शाळांची संख्या ठरविण्यात यावी.
४) केंद्रीय प्राथमिक शाळेला संलग्न करावयाच्या प्राथमिक शाळा पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात याव्यात :-
   अ) केंद्रीय प्राथमिक शाळेच्या ठिकाणी माध्यमिक शाळा असल्यास तिच्या सर्व पूरक प्राथमिक शाळा,
   ब) केंद्रीय प्राथमिक शाळेच्या ठिकाणी माध्यमिक शाळा नसल्यास आणि ती पूर्ण प्राथमिक शाळा असल्यास तिच्या पूरक प्राथमिक शाळा,
   क) केंद्रीय प्राथमिक शाळेच्या ठिकाणी माध्यमिक शाळा नसल्यास आणि ती पूर्ण प्राथमिक शाळा नसल्यास तिच्या आठ किलोमीटरच्या परिसरातील सर्व प्राथमिक शाळा, मात्र या शाळांची संख्या आठपेक्षा कमी व बारापेक्षा जास्त असता कामा नये.
५) जिल्हा परिषदेची प्रत्येक प्राथमिक शाळा कोणत्या ना कोणत्या तरी केंद्रीय प्राथमिक शाळेशी संलग्न झालेली असावी.
६) वरील (१) ते (४) च्या निकषांनुसार केंद्रीय प्राथमिक शाळांमध्ये रुपांतर करावयाच्या प्राथमिक शाळांची यादी तयार करुन तिला जिल्हा परिषदेच्या शिक्षण समितीची मंजूरी घेण्यात यावी.
७) केंद्रीय प्राथमिक शाळा आणि त्यांना जोडावयाच्या प्राथमिक शाळा यांची निवड अतिशय काळजीपूर्वक करण्यात यावी. एकदा निवड केलेल्या केंद्रीय प्राथमिक शाळा आणि त्यांच्याशी संलग्न प्राथमिक शाळा यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल नंतरच्या काळात करण्याची गरज भासू नये.
८) प्रत्येक जिल्ह्याला मंजूर केलेल्या केंद्रीय प्राथमिक शाळांची संख्या विचारात घेऊन प्रत्येक केंद्रीय प्राथमिक शाळेला संलग्न करावयाच्या प्राथमिक शाळांची संख्या कमी-अधिक करुन सर्व प्राथमिक शाळा मंजूर केंद्रीय प्राथमिक शाळांना जोडण्यात याव्यात.

९. <u>केंद्रीय प्राथमिक शाळांच्या केंद्र प्रमुखांची कर्तव्ये :-</u>

१) समूहातील सर्व प्राथमिक शिक्षकांसाठी प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या संदर्भात (पटनोंदणी, उपस्थिती वाढविणे व शिक्षणाचा दर्जा) मासिक व वार्षिक उद्दिष्टे ठरवून देणे.
२) समूहातील सर्व प्राथमिक शिक्षकांसाठी मासिक घटक नियोजन निश्चित करुन देणे व त्यानुसार केलेल्या अध्यापनाविषयीचा आढावा पुढील महिन्याच्या बैठकीत घेणे.
३) दर तिमाहीस आणि वर्षाच्या अखेरीस समूहातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांची किमान अध्ययन क्षमतांवरील प्रभुत्वाची चांचणी घेऊन प्रत्येक शिक्षकाच्या कार्याचे या संदर्भात मूल्यमापन करणे.
४) समूहातील प्रत्येक प्राथमिक शाळेला महिन्यातून दोन वेळा भेट देणे. या दोन भेटीपैकी एक भेट पूर्वसूचना न देता घ्यावी व अशा सलग तीन भेटींमध्ये एखादा शिक्षक गैरहजर आढळला तर त्यांची एक दिवसाची नैमित्तिक रजा कापण्यात यावी. समूहातील शाळांच्या कामकाजावर देखरेख करणे व त्यांची तपासणी करणे. समूहातील शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी शिक्षकांची मासिक गट संमेलने आयोजित करणे.
५) समूहातील प्राथमिक शाळांचा दर्जा ... याची खात्री करणे.
६) समूहातील शिक्षक नियमितपणे शाळेत येतात याची खात्री करणे.
७) समूहातील शिक्षक शाळेच्या गावी राहत असल्याबद्दल खात्री करणे.
८) समूहातील सर्व शाळांमध्ये सहशालेय कार्यक्रमांचे नियोजन करणे.
९) समूहातील प्रत्येक शिक्षकासाठी पालक भेटींचा कार्यक्रम निश्चित करुन देणे.
१०) समूहातील प्रत्येक शिक्षकासाठी विद्यार्थ्यांची सर्वंकष माहिती मिळविण्याचा कार्यक्रम निश्चित करुन देणे.
११) शाळेत दाखल झालेल्या परंतु सातत्याने गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यांची विशेषत: मुलींची माहिती घेऊन ती शाळेत टिकण्याच्या दृष्टीने शिक्षकांना पाठपुराव्यासाठी लक्ष्य निश्चित करुन देणे.
१२) समूहातील शाळांमध्ये शाळेच्या स्तरावर, तसेच आंतरशालेय स्पर्धांचे आयोजन करणे.

१३) ग्राम शिक्षण समित्यांच्या कामकाजांचा आढावा घेणे व त्यांच्या ठरावांची नोंद घेऊन आवश्यक ती कार्यवाही करणे.

१४) महिन्यातून किमान एका ग्राम शिक्षण समितीच्या बैठकीस उपस्थित राहून मार्गदर्शन करणे.

१५) उपलब्ध साधनांपासून आणि कमी खर्चात शैक्षणिक साहित्य तयार करण्यासाठी गटातील शिक्षकांना मार्गदर्शन करणे.

१६) शाळा सुधार, शैक्षणिक उठाव, सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना, उपस्थिती भत्ता, गणवेष, पुस्तक पेढी इत्यादी कार्यक्रमांचा आढावा घेऊन त्यांची व्याप्ती आणि उपयुक्तता वाढविण्यासाठी प्रेरक म्हणून काम करणे.

१७) समूहातील प्राथमिक शाळांची प्रतवारी वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.

१८) समूहातील सर्व मुख्याध्यापकांचे/ शाळा प्रमुखांचे वार्षिक गोपनीय अहवाल लिहिणे व शिक्षकांचे मुख्याध्यापक /शाळा प्रमुख यानी लिहिलेले गोपनीय अहवालांचे त्याना विहित केलेल्या वार्षिक लक्ष्यांच्या संदर्भात पुनर्विलोकन करणे.

१९) ऑपरेशन ब्लॅकबोर्ड व अन्य योजनांमार्फत प्राप्त होणाऱ्या साहित्याचा उपयोग करण्याचे संदर्भात मार्गदर्शन करणे.

२०) आठवड्यातून किमान चार . तासिका अध्यापन करणे.

२१) केंद्र प्रमुखांनी त्यांच्या जिल्ह्यामध्ये संपूर्ण साक्षरता अभियान आणि त्यांच्या कार्यक्षेत्रातील साक्षरोत्तर कार्यक्रम किंवा निरंतर शिक्षणाबाबतही नियंत्रण ठेवणे व संनियंत्रण करणे.

२२) शासन वेळोवेळी नेमून देईल ती कामे करणे.

१०. <u>केंद्रीय प्राथमिक शाळेला मंजूर असलेल्या रुपये २०.०००/- एवढ्या अनुदानातून खर्च करावयाच्या बाबी :-</u>

केंद्रीय प्राथमिक शाळेला शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी दरवर्षी रुपये २०,०००/- एवढी आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देण्यात येईल. या तरतुदीचा उपयोग पुढीलप्रमाणे करण्यात यावा :-

१) शैक्षणिक तंत्रज्ञानाची साधने, उदा. ओव्हरहेड प्रॉजेक्टर, स्लाईड, प्रॉजेक्टर, व्ही.सी.आर., ध्वनीक्षेपण यंत्रणा, चक्रमुद्रण यंत्र इत्यादींची खरेदी.

२) इतर शैक्षणिक साहित्य.

३) शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यासाठी पुस्तके.

४) केंद्र शाळा शिक्षण सल्लागार समित्यांच्या बैठकांच्या आयोजनासाठी येणारा किरकोळ खर्च.

५) गटशाळांच्या भेटीसाठी केंद्रीय प्राथमिक शाळेच्या केंद्र प्रमुखांना दरमहा रुपये २००/- या दराने कायम स्वरुपी प्रवास भत्ता देण्यासाठी होणारा खर्च.

६) सहशालेय कार्यक्रम व विविध प्रकारच्या स्पर्धा आयोजित करण्यासाठी येणारा खर्च.

७) स्टेशनरी.

८) शैक्षणिक साहित्य व यंत्रसामुग्री इत्यादींच्या दुरुस्तीवर व देखभालीवर येणारा खर्च,

९) केंद्र प्रमुखांसाठी एक कपाट, एक खुर्ची व एक टेबल हे फर्निचर खरेदी करणे.

(ज्या जिल्हा परिषदांनी त्यांच्या जिल्ह्यातील केंद्र प्रमुखांना कपाटे, खुर्च्या उपलब्ध करुन दिलेली नसतील अशाच केंद्र शाळांसाठी सदर फर्निचर आवश्यकतेनुसार खरेदी करावयाचे आहे.)

<u>केंद्रीय प्राथमिक शाळेला प्राप्त होणाऱ्या अनुदानाच्या खर्चाची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे राहिल :-</u>

अ) केंद्रीय प्राथमिक शाळेला प्राप्त होणारे अनुदान केंद्र प्रमुखांनी केंद्रीय शाळा सल्लागार समितीच्या एका सदस्यासह संयुक्त खात्यावर नजिकच्या बँकेत अथवा पोस्टात जमा करावे.

ब) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक पीआरई १०९४/७०४/एक/प्राशि-१, दिनांक १४ नोव्हेंबर, १९९४ मधील प्रपत्र "६" मध्ये नमूद केलेल्या आठ बाबींचा प्राधान्यक्रम ठरवून त्यास

केंद्रशाळा सल्लागार समितीची मान्यता घेण्यात यावी.

क) साहित्य खरेदीवर खर्च करताना दरपत्रक मागविणे, दरपत्रक मंजूर करणे, साहित्य संपादन करणे, जमाखर्चाची नोंदवही ठेवणे, खर्च केलेल्या साहित्याची नोंदवही ठेवणे याबाबतीत जिल्हा परिषद लेखा संहितेतील तरतूदीचा अवलंब करावा.

ड) शाळा भेटीचे/तपासणीच्या वेळी शिक्षण विस्तार अधिकारी यांनी खरेदीची कार्यपद्धती जिल्हा परिषदेच्या जिल्हा परिषद लेखा संहितेतील तरतुदीनुसार लेखा संहितेतील तरतुदीप्रमाणे केली किंवा नाही याची तपासणी करावी. नोंदवह्या ठेवल्या आहेत किंवा नाही याचीही पाहणी करावी.

११. <u>केंद्र प्रमुखांची वेतन निश्चिती :-</u>

अ) रुपये १२००-२०४० या प्राथमिक शिक्षकांच्या वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या प्राथमिक शिक्षकांची केंद्र प्रमुख या पदावर पदोन्नतीने नियुक्ती झाल्यास त्यांची महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ११(१)(अ) अनुसार वेतननिश्चिती करावी.

ब) प्राथमिक शाळातील शिक्षक/मुख्याध्यापक/पदवीधर प्रशिक्षित शिक्षक अशा त्रिस्तरीय वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या शिक्षकांची केंद्र प्रमुख या पदावर नियुक्ती झाल्यानंतर त्यांना त्यांच्या मूळ त्रिस्तरीय वेतनश्रेणीत अनुज्ञेय असलेली/होणारी वरिष्ठ किंवा निवडश्रेणी, केंद्र प्रमुख हे पद धारण करीत असताना देखील, त्या त्या तारखेपासून आपोआप अनुज्ञेय होईल. मात्र त्यांनी त्रिस्तरीय वेतनश्रेणीतील वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणी लागू होण्यासाठी आवश्यक असलेल्या अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

क) जे शिक्षक/मुख्याध्यापक वरिष्ठ किंवा निवड श्रेणीत वेतन घेत असून ज्यांची केंद्र प्रमुख या पदावर नियुक्ती झाली आहे, त्यांची केंद्र प्रमुख पदावरील वेतननिश्चिती होणार नाही. त्यांना शिक्षक/मुख्याध्यापक पदावर अनुज्ञेय असलेलेच वेतन अनुज्ञेय राहिल.

१२. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासंदर्भात स्थापन करण्यात आलेल्या केंद्रीय प्राथमिक शाळांच्या संदर्भात व केंद्र प्रमुखांच्या पदासंदर्भात वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले आदेश विचारात घेऊन हा सर्व समावेशक शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे. या सर्व समावेशक शासन निर्णयातील ज्या बाबी यापूर्वी निर्गमित केलेल्या आदेशांशी विसंगत असतील तर त्यासंबंधीचा मूळ शासन निर्णय/आदेश प्राह्य धरण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(शा. पां. जोशी)<br>
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,<br>
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.<br>
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक<br>
सर्व जिल्हाधिकारी<br>
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा<br>
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषदा<br>
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.

४२०० →४५००